पुतळा अनावरण समारंभ संपन्न

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरच्या कराड येथील शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालयात श्री स्वामी विवेकानंद, संस्थेचे संकल्पक-संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या अर्धाकृती पुतळ्यांचे अनावरण समारंभ, मंगळवार दि. 05 मार्च, 2019 रोजी सकाळी 10 :30 वा संपन्न झाला.

सदर समारंभाचे उद्घाटक म्हणून पुणे येथील रामकृष्ण मठाचे अध्यक्ष आदरणीय स्वामी श्रीकांतानंदजी महाराज हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून सिक्कीमचे माजी राज्यपाल सन्माननीय श्रीनिवासजी पाटीलसाहेब, महाराष्ट्र राज्य सहकारी परिषदेचे अध्यक्ष मा. शेखर चरेगांवकर, राज्याचे माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण, आ. आनंदराव पाटील, आ. बाळासाहेब पाटील हे उपस्थित होते. तर समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते.

सदर समारंभाच्या स्वागताध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील हे होते.